| MHLA150000492019 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | २१/०१/२०१९ |
| | नोंदणी दिनांक | : | २१/०१/२०१९ |
| | निकाल दिनांक | : | ०१/०७/२०२६ |
| | कालावधी | : | ०७व. ०५म. ११दि. |

**भाग– अ**

फॉर्म क्र. XXXII

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (I))

| | | |
|---|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.१ चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी – व्ही. एस. वाघमोडे यांच्या समोर.) | |
| | **संक्षीप्त फौजदारी खटला क्र. ०७/२०१९**<br>नि.क्र. | |
| फिर्यादी | महा. शासन द्वारा– पोलीस ठाणे चाकूर, ता. चाकूर जि. लातूर | |
| सहा. सरकारी अभियोक्ता | | श्रीमती पी.एस. भराडीया |
| आरोपी | १. | नवनाथ नागनाथ बिराजदार,<br>वय – २० वर्ष, धंदा – शिक्षण, |
| | २. | शंकर अशोक मानखेडे,<br>वय – २२ वर्ष, धंदा – शिक्षण, |
| | ३. | सदानंद खुशालराव बिराजदार,<br>वय – ३१ वर्ष, धंदा – शेती, |
| | ४. | ज्ञानेश्वर विनायक पांचाळ,<br>वय – २८ वर्ष, धंदा – व्यापार, |
| | ५. | आकाश सुरेश दांडगे,<br>वय – २१ वर्ष, धंदा – मेकॅनिक,<br>वरील सर्व रा. नळेगांव ता. चाकूर जि. लातूर |

| | | |
|---|---|---|
| आरोपींचे विधीज्ञ | | श्री. एस.व्ही. गंभीरे |

## भाग – ब

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | १९/०९/२०१८ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २१/०९/२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २१/०१/२०१९ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | १६/०४/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १६/०४/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०१/०७/२०२६ |
| जर, दोषसिध्दी झाली असेल तर शिक्षा फर्माविण्याचा दिनांक | --- |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | दोषमुक्ती किंवा दोषसिध्दी | शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नवनाथ नागनाथ बिराजदार, | २४/०९/२०१८ | २४/०९/२०१८ | भा.दं.वि कलम १८८ व म.पो.अधि. कलम ३६/१३४ नुसार. | दोषमुक्त. | - | - |
| २. | शंकर अशोक मानखेडे | २४/०९/२०१८ | २४/०९/२०१८ | भा.दं.वि कलम १८८ व म.पो.अधि. कलम ३६/१३४ नुसार. | दोषमुक्त. | - | - |
| ३. | सदानंद खुशालराव बिराजदार | २४/०९/२०१८ | २४/०९/२०१८ | भा.दं.वि कलम १८८ व म.पो.अधि. | दोषमुक्त. | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कलम ३६/१३ ४ नुसार. | | | |
| ४. | ज्ञानेश्वर विनायक पांचाळ, | २४/०९/२०१८ | २४/०९/२० १८ | भा.दं.वि कलम १८८ व म.पो.अधि. कलम ३६/१३ ४ नुसार. | दोषमुक्त. | – | – |
| ५. | आकाश सुरेश दांडगे | २४/०९/२०१८ | २४/०९/२० १८ | भा.दं.वि कलम १८८ व म.पो.अधि. कलम ३६/१३ ४ नुसार. | दोषमुक्त. | – | – |

## भाग 'क'

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (iii))

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.**

**–अभियोगपक्ष –**

| **अनु.क्र.** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०१ | हाणमंत पंडीत भुसे | फिर्यादी |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०२ | गोविंद हरिभाऊ राठोड | तपास अधिकारी |

ब– **–बचावपक्षाचे साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| –– | –– | — |

क– **–न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
| -- | -- | – |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष / न्यायालय, यांचे निशाणी यादी

अ– **–अभियोगपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १. | नि.क्र. ५३ | प्राथमिक अहवाल |
| २. | नि.क्र. ५४ | फिर्याद |

ब – **–बचावपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क – –न्यायालयाचे निशाणी क्रमांक –**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड – न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी**

| **अनु.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**इ. –भौतिक वस्तु–**

| **अनु.क्र.** | **भौतिक वस्तु क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**– न्यायनिर्णय –**

(पारीत दि.०१.०७.२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम १८८ आणि मुंबई पोलीस अधिनियम कलम ३६/१३४ अन्वये अपराध केले बाबत खटला चालवण्यात आला.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

दि.२१.०९.२०१८ रोजी २०.३० वा. मौजे नळेगाव येथे आरोपींनी गणेश विसर्जन मिरवणूक उशिरा काढून व त्यांना पोलीसांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ मध्ये दिलेल्या अधिकारान्वये दिलेल्या आदेशाचे

पालन केले नाही व ठरवून दिलेला मार्ग बदलून मिरवणूक काढली. त्यामुळे फिर्यादीने सदरची फिर्याद दाखल केली.

३. त्या अनुषंगाने चाकूर पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड विधान कलम १८८ आणि मुंबई पोलीस अधिनियम कलम ३६/१३४ चा गुन्हा गु.र.क्र. ३०६/२०१८ अन्वये नोंद झाला. तपासी अधिकारी जी.एच. राठोड, पो.हे.कॉ. पोलीस ठाणे चाकूर, यांनी सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान घटनास्थळाला भेट देवुन घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपीस अटक करुन अटकेचा पंचनामा तयार केला. तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. नि.क्र. ४० वर आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम १८८ आणि मुंबई पोलीस अधिनियम कलम ३६/१३४ नुसार दोषारोपाचा तपशिल नोंदविण्यात आला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले. नि.क्र. १ वरील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. त्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र.८७ ते ९१ वर नोंदवले. आरोपीने त्यांच्या विरुध्द खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. दि.२१/०९/२०१८ रोजी रात्री २०.३० वा. च्या सुमारास मौजे नळेगाव ता. चाकूर जि. लातूर येथे आरोपींनी पोलीसांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन गणेश विसर्जन मिरवणुक उशिरा काढून पोलीसांनी ठरवून दिलेला मार्ग बदलून मिरवणुक काढली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम १८८ आणि मुं.पो.अधि.कलम ३६/१३४ नुसार गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ...नाही. |
| २. आदेश काय ? | आरोपीस निर्दोष |

**मुद्दे** **निष्कर्ष**

मुक्त करण्यात येते.

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ बाबत –**

६. साक्षीदार क्र. १ हाणमंत पंडीत भुसे, फिर्यादी यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, दि. २१.०९.२०१८ रोजी गणेश विसर्जन बंदोबस्त नळेगाव येथे ते होते. प्रत्येकी मंडळाकरता पोलीसांचा एक कर्मचारी मंडळापासून ते विसर्जनाच्या ठिकाणापर्यंत देण्यात आला होता. त्यांची नेमणूक खडक हणुमान गणेश मंडळ नळेगाव येथे करण्यात आली होती. त्या मंडळाने ०६.०० वाजेपर्यंत मिरवणुक काढली नव्हती. ते दोन तास तेथेच नाचत होते. त्यांना शिवाजी चौकातून डावीकडे वळून पोलीस चौकीच्या समोरुन विसर्जन विहीरीकडे जाण्याचा मार्ग देण्यात आला होता. रात्री ०८.३० वा. खडक हणुमान गणेश मंडळाची मिरवणूक शिवाजी चौक येथे आली. शिवाजी चौकातून ते मंडळ डावीकडे जाण्या ऐवजी विरुध्द दिशेने बसस्थानकाकडे गेले होते.

७. शिवाजी चौकामध्ये डी.वाय.एस.पी. लंजीले व इतर अधिकारी, कर्मचारी बंदोबस्ताकरीता होते. त्या मंडळाने डावीकडे न जाता उजवीकडे जाऊन उध्दट वर्तन केले होते. त्यांच्या उध्दट वर्तनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. गणेश मंडळाचे पदाधिकारी उध्दट वर्तन करत होते. त्यामुळे त्यांनी नि.क्र. ५३ नुसार प्राथमिक अहवाल दिला व नि.क्र. ५४ नुसार पोलीस ठाणे चाकूर येथे तक्रार दिली. परंतू आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये त्यांनी कथन केले की, त्यांनी तपास अधिकारी यांच्याकडे खडक हनुमान मंडळाकडे ते नियुक्त होते, याबाबतचा दस्त दिला नाही तसेच खडक हनुमान गणेश मंडळाच्या मिरवणूकीच्या मार्गाबाबतचा दस्तऐवज दिला नाही. तसेच तसेच त्यांनी हे मान्य केले की, खडक हनुमान गणेश मंडळाच्या सचिव पदावर, कोषागार पदावर व इतर पदाधिकारी कोण होते हे त्यांना माहीत नाही.

त्यांच्याकडे गणेश मंडळाचे पदाधिकारी कोण होते याबाबतचा दस्तऐवज नव्हता किंवा ते त्यांनी तपास अधिकारी यांना दिला नाही. त्यांना खडक हनुमान गणेश मंडळाच्या सचिव पदावर, कोषागार पदावर व मिरवणूक प्रमुखाबाबत कांहीही माहीत नाही. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कोठेही नमुद केले नाही की, आरोपी त्या मिरवणुकीमध्ये नाचत होते किंवा आरोपी हे खडक हणुमान गणेश मंडळाचे सदस्य होते. तसेच साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात असे देखील कोठे नमुद केले नाही की, आरोपी यांनी आदेशित केलेल्या मार्गानुसार मिरवणूक न काढता दुस–या दिशेने मिरवणूक काढली होती.

८. साक्षीदार क्र. २ यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, सन २०१४ ते सन २०१९ पर्यंत ते चाकूर पोलीस ठाणे चाकूर येथे कार्यरत होते. दि.२२.०९.२०१८ रोजी गुन्हा क्र. ३०६/२०१८ कलम १८८, भादवि आणि महा. पोलीस अधिनियम कलम ३६/१३४ अंतर्गत चा तपास माझेकडे देण्यात आला. त्यांनी दोन साक्षीदार तपासले होते. तपासांती आरोपी विरुध्द पुरावा मिळाल्याने मी दोषारोपपत्र दाखल केले. परंतू आरोपीतर्फे घेण्यात आलेलया उलटतपासात त्यांनी असे कथन केले की, फिर्यादी पोलीस आहे. त्यांनी फिर्यादीचे पुरवणी तपास टिपण नोंदविले नाही. हे मान्य केले की, फिर्यादीच्या जबाबामध्ये एकाही आरोपीचे नाव नमुद करण्यात आले नाही. विसर्जन मिरवणुकीचा मार्ग काय होता याबाबतचा वरिष्ठांचा कोणताही आदेश दोषारोपपत्रासोबत दाखल केले नाही. दोषारोपपत्रासोबत खडक हणुमान गणेश मंडळ यांचे अध्यक्ष, सचिव, सदस्य, मिरवणुक प्रमुख, प्रसिध्दी प्रमुख व इतर पदाधिकारी या बाबतचा कोणताही दस्त त्यांनी दाखल केला नाही. साक्षीदार क्र. २ यांनी हे मान्य केले की, त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला नाही. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कोठेही नमुद केले नाही की, आरोपी हे खडक हणुमान गणेश मंडळ नळेगावचे सदस्य आहेत किंवा त्या बाबत त्यांना पुरावा मिळून आला होता.

९. अभिलेखावरील उपलब्ध अभियोगपक्षाच्या पुराव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, खडक हणुमान गणेश मंडळ यांचे अध्यक्ष, सचिव, सदस्य, मिरवणुक प्रमुख, प्रसिध्दी प्रमुख व इतर पदाधिकारी कोण होते किंवा त्याबाबत कोणताही दस्त नसल्यामुळे सदर मंडळाचे पदाधिकारी हे आरोपीच होते हे शाबीत होत नाही. शिवाय सदर मंडळाला शिवाजी चौकातून डावीकडे वळून पोलीस चौकीच्या समोरुन विसर्जन विहीरीकडे जाण्याचा मार्ग देण्यात आला होता, याबाबतच कोणतेही कागदोपत्री पुरावा अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर दाखल करण्यात आले नाही, जेणे करुन सदर मंडळाला, कथत मार्ग दिल्याचे निष्पन्न होईल. पुरेशी संधी देऊन देखील अभियोगपक्षाने इतर साक्षीदार तपासले नाहीत, परिणामी नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाची बाजु बंद करण्यात आली. कथीत मंडळाने कथीत मार्ग न वापरता उशिराने मिरवणू काढून दुसरा मार्ग वापरला तसेच पोलीसांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केले याबाबत, अभियोग पक्षाने कोणताही पुरावा सिध्द केलेला नाही. एकंदरीत आरोपीविरुध्द संशया पलीकडचा पुरावा सादर करण्यास अभियोगपक्ष असफल ठरलेला आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>** –

१०. मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी आलेले आहे. परिणामी आरोपी हे कथीत गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात, त्यामुळे म्हणून खालीप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपी नवनाथ नागनाथ बिराजदार, शंकर अशोक मानखेडे, सदानंद खुशालराव बिराजदार, ज्ञानेश्वर विनायक पांचाळ, आकाश सुरेश दांडगे यांना भारतीय दंड संहिता कलम १८६० चे कलम १८८ आणि महा. पोलीस अधिनियम कलम ३६/१३४ च्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीने पुर्वीचे दिलेले वैयक्तिक बंधपत्र व जात मुचलका हे फौजदारी |

| | |
|---|---|
| | प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–ए च्या तरतुदी करीता आव्हान कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे. |
| ३. | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.07.01

दिनांक – ०१.०७.२०२६

(व्ही. एस. वाघमोडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | M.B. Pathan |
| Name of the Court | : | Civil Judge J.D. & J.M.F.C, Chakur. |
| Date of Order/ Judgment | : | 01/07/2026 |
| Order/Judgment signed by Presiding Officer on | : | 01/07/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 01/07/2026 |